जिल्हास्तरीय मुख्यमंत्री सहाय्यता
निधी कक्ष सुरु करणेबाबत.

महाराष्ट्र शासन

मुख्यमंत्री सचिवालय

परिपत्रक क्रमांक :- मुमंसनि-२०२५/प्र.क्र.०३/निधी कक्ष

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,

मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.

दिनांक :- २२.०१.२०२५

परिपत्रक :-

मा.मुख्यमंत्री कार्यालयातील “मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षा” कडून अनेक दुर्धर आजारांवरील उपचारांसाठी येणाऱ्या खर्चाकरीता रुग्णांना संबंधित रुग्णालयामार्फत आर्थिक सहाय्य देण्यात येते. तसेच आपत्ती प्रसंगीही आर्थिक मदत देण्यात येते. या अनुषंगाने मदत मिळविण्यासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षामध्ये असंख्य अर्ज प्राप्त होतात.

२. मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षामध्ये सादर झालेल्या अर्जाचा पाठपुरावा करण्यासाठी रुग्ण व त्यांचे नातेवाईक मंत्रालयात येत असल्याचे निदर्शनास आले आहे. नागरीकांना या सेवा सहजपणे उपलब्ध व्हाव्यात याकरीता जिल्हाधिकारी कार्यालयात “मुख्यमंत्री सहाय्यता कक्ष” सुरु करण्याबाबत याद्वारे सूचित करण्यात येत आहे. त्यामुळे नागरीकांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या प्रकरणांची माहिती त्यांच्याच जिल्ह्यात उपलब्ध होईल. तसेच नागरीकांच्या वेळेचा व पैशाचा अपव्यय टाळता येईल.

३. यास्तव, प्रत्येक जिल्ह्यात जिल्हाधिकारी कार्यालय येथे खालील प्रमाणे “जिल्हास्तरीय मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष” स्थापन करण्यात येत आहे.

| अ.क्र. | पदनाम | पद |
|---|---|---|
| १. | तज्ञ डॉक्टर (प्रतिनियुक्ती किंवा उसनवारी नियुक्ती) | अध्यक्ष |
| २. | समन्वयक (बाह्यस्त्रोताद्वारे) | सदस्य |
| ३. | लिपिक- टंकलेखक (प्रतिनियुक्ती किंवा उसनवारी नियुक्ती / बाह्यस्त्रोताद्वारे) | सदस्य |
| ४. | वैद्यकीय समाजसेवा अधिक्षक (प्रतिनियुक्ती किंवा उसनवारी नियुक्ती / बाह्यस्त्रोताद्वारे) | सदस्य |

४. जिल्हास्तरीय मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाची कार्ये

४.१ संबंधित जिल्ह्यातील मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षास प्राप्त झालेल्या अर्जाची सद्यस्थिती नागरिकांना उपलब्ध करुन देणे व समस्यांचे निराकरण करणे.

४.२ कक्षामध्ये आलेल्या रुग्णांना / नातेवाईकांना अर्ज भरण्यास सहाय्य करणे.

४.३ मुख्यमंत्री सहाय्यता निधीमधून आर्थिक मदत झालेल्या रुग्णांची रुग्णालयात जावून भेट घेणे.

४.४ मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाबाबत जनजागृती / प्रसिध्दी करणे.

४.५ जिल्ह्यातील आपत्तीच्या ठिकाणी भेटी देणे.

४.६ मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षामध्ये अधिकाधिक देणग्यांचा ओघ येण्याकरीता अभियान चालविणे.

४.७ जिल्ह्यात आयोजित आरोग्य शिबिराबाबत समन्वय करणे.

५. जिल्हास्तरीय मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षाच्या समन्वयक सदस्य यांची नियुक्ती जिल्हाधिकारी यांचेमार्फत "बाह्यस्त्रोताने" करण्यात यावी. त्यांच्या निवडीचे निकष जिल्हाधिकारी यांना स्वतंत्रपणे कळविण्यात येतील. तज्ञ डॉक्टर व लिपिक टंकलेखक यांची नियुक्ती शासनाच्या इतर विभागातून उसनवारी तत्वावर किंवा प्रतिनियुक्तीने तातडीने करण्यात यावी. तसेच कक्षातील सदस्यांना ओळखपत्र, कक्षासाठी आवश्यक साहित्य, साधनसामुग्री व जागा दर्शनी भागामध्ये उपलब्ध करुन देण्यात यावी.

६. सदर परिपत्रक मुख्यमंत्री सचिवालयाच्या cmrf.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

SHARAD RAMLING GHAVATE
Digitally signed by SHARAD RAMLING GHAVATE
Date: 2025.01.22 18:41:03 +05'30'

(शरद रा. घावटे)
कक्ष अधिकारी
मुख्यमंत्री सचिवालय

प्रति,

१. मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई
२. सर्व मा.मंत्री / मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा.मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
४. सर्व मंत्रालयीन विभागाचे अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मुख्यमंत्री सचिवालयातील सर्व अधिकारी, मुख्यमंत्री सचिवालय, मुंबई.
६. सर्व जिल्हाधिकारी.
७. कक्ष प्रमुख, मुख्यमंत्री सहाय्यता निधी, मुख्यमंत्री सचिवालय, मुंबई.
८. सर्व नोंदणीकृत रुग्णालये.
९. निवड नस्ती.